महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. -१४४ ■ गुरूवार दि. १९ डिसेंबर २०२४ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

महाराष्ट्रातील जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवर प्रतिनिधी होण्याची सुवर्णसंधी!
पत्रकारीता करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी संपर्क साधावा.
✻ संपादक ✻
मो. क्र. ९५४५९ १०१७७ व ९२७२४ ५३९२१

## मुंबईला बोट उलटल्याने १३ जणांचा मृत्यू

### मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लाखाची मदत 'निलकमल' बोट चालकावर होणार कारवाई?

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मुंबई/प्रतिनिधी-:** मुंबईच्या गेट वे ऑफ इंडियाकडून एलिफंटाकडे जात असलेली 'निलकमल' ही बोट पाण्यात उलटल्याने १३ जणांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना आज सायंकाळी घडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली. मृत १३ जणांपैकी ३ जण नौदलाचे असल्याची माहितीही त्यांनी दिली असून या दुर्घटनेबाबत संपुर्ण माहिती उद्या मिळेल असेही ते म्हणाले असून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लाखांची मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्यात येणार असल्याचे श्री फडणवीस यांनी सांगीतले.

नीलकमल ही बोट बुधवारी गेट ऑफ इंडियाजवळ समुद्रात बुडाली. या बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु नौदलाकडून त्याचा इन्कार करण्यात आला. दरम्यान नीलकमल बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी होते. बोटीची क्षमता ८० असताना



त्यातून ११० जण प्रवास करत होते. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतूक करणाऱ्या बोट मालकावर गुन्हा दाखल होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, अपघातात १०१ लोकांना वाचवण्यात आले आहे. संध्याकाळी ७.३० पर्यंतची ही माहिती आहे. अद्याप पूर्ण माहिती मिळाली नाही. या घटनेची नौदल आणि मुंबई पोलीस चौकशी करणार आहे.

मुंबईतील गेट ऑफ इंडियावरुन नीलकमल ही बोट एलिफंटाकडे बुधवारी संध्याकाळी निघाली होती. या बोटीची क्षमता ८० प्रवाश्यांची आहे. परंतु त्या बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशी होते. एकूण ११० प्रवाशी बोटीत असल्याची माहिती समोर आली आहे. आता या प्रकरणी बोट मालकावर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती देण्यात आली. बोटीवर तब्बल ११० जण होते अशी माहिती मुंबई महानगरपालिकेकडून (बीएमसी) अधिकृतपणे देण्यात आली. विविध रुग्णालयामध्ये दाखल असलेले प्रवाशी ११० होते. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी बोटीत असल्याचे सिद्ध झाले. दरम्यान, नीलकमल बोटीला धडकणाऱ्या नौदलाच्या स्पीड बोटीत तांत्रिक बिघाड झाल्याचा संशय नौदलाकडून व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात अधिकृत माहिती नौदलाकडून देण्यात येणार आहे. गेट वे ऑफ इंडिया ते एलिफंटा बोटीला झालेल्या अपघातातील जखमींना उपचारासाठी नवी मुंबईतील जेएनपीए रुग्यालयात दाखल केले आहे. त्यातील एका सहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे.

## भद्रकालीत अवैध गोवंश कत्तलखान्याला हासत हासत हासे ची परवानगी?

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक/प्रतिनिधी-:** हसणे हा मनुष्याचा चांगला गुणधर्म आहे, हासत हासत हसणारा एखाद्याला खूप काही देऊन टाकतो परंतु हसता हसता दिलेलं कुणाच्या भावना विरोधी, धर्मविरोधी किंबहुना मनुष्य धर्माविरोधी दिलं जात नाही, मात्र नाशिक मधील भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अगदी हसत हसत हिंदू धर्मीयांच्या भावनांना पायाखाली तुडवत राष्ट्रमाता घोषित केलेल्या गो-मातेला कत्तल करणाऱ्या गोवंश कत्तलखान्यांना हासे मनमुराद परवानगी देत असल्याचे बोलले जात आहे. गेल्या एक वर्षात ह्याच भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध कत्तलखान्यांवर सर्वच धर्मांचं रक्षण करणारे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वेळेला कारवाई करण्यात आलेली आहे या कारवायांमध्ये कत्तलीसाठी आणलेल्या अनेक गोवंशांना जीवदान मिळाल्याने समस्त नाशिककरांनी शहर आयुक्तांसह नाशिक पोलिसांचे अभिनंदन केले आहे परंतु ह्याच भागात मागच्या आठवड्यात हरी मंदिर इमारती जवळ असलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये पुन्हा शहर पोलिसांनी कारवाई करत सहा गोवंशांना जीवदान देत तब्बल ३०० किलो मास सह गोवंशाची कत्तल करत कापलेली तीन मुंडके जमा करत गुन्हा दाखल केला. हे प्रकरण गंभीरतेने घेण्याचे सोडून पुन्हा कत्तलखाने जोमात सुरू असल्याने आयुक्तांच्या चांगल्या कामगिरीला गोवंशाच्या रक्ताने माखवण्याचे काम हसेला करायचे आहे का असा प्रश्न या निमित्ताने तमाम हिंदू संघटनांकडून विचारला जात आहे. यापूर्वी सध्याचे नवनिर्वाचित महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनी याच भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थ विरोधी, लव जिहाद, लँड जिहाद सारख्या गंभीर प्रश्नांवर सभागृहात लक्षवेधी मांडली होती त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध धंद्यांकडे लागले होते यावर कारवाई करण्याचे स्पष्ट सूचना गृह खात्यासह पिठासीन अधिकाऱ्यांनी दिल्यानंतरही काही काळ या ठिकाणी अवैध धंदे व धंदे चालकांना चपराक बसल्याचे (पान २ वर)

## तुळजापुरात गुणरत्न सदावर्ते यांच्यावर मराठा कार्यकर्त्यांचा संताप; गोंधळ घालण्याचा प्रयत्न



**दै. आवाज वृत्तसेवा...**

**तुळजापूर/प्रतिनिधी -:** तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आलेल्या ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना आज मराठा कार्यकर्त्यांच्या रोषाचा सामना करावा लागला. सदावर्ते यांच्यावर मराठा समाजाबाबत सातत्याने बेताल वक्तव्य केल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी बुक्का फेकत त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. सदावर्ते हे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आणि एसटी कर्मचारी संघटनेच्या मीटिंगसाठी तुळजापूर येथे आले होते. मात्र, त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच मराठा कार्यकर्ते संतप्त झाले आणि गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला. सदावर्ते यांच्याविरोधातील कार्यकर्त्यांचा रोष पाहता घटनास्थळी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. सदावर्ते यांच्यावरील आरोप आणि आजच्या गोंधळावर अद्याप त्यांची प्रतिक्रिया मिळालेली नाही. दरम्यान, या घटनेने तुळजापूर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा; महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मुंबई/प्रतिनिधी-:** महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे.

या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहे. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.

## नवीन वर्षामध्ये सुमारे ३५०० लालपरी बसेस् एसटीच्या ताफ्यात दाखल होणार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**किरण घायदार, नाशिक/प्रतिनिधी-:** राज्यातील नवीन फडणवीस सरकारने सत्तेवर येताच महाराष्ट्रासाठी १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे लक्ष्य ठरवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमच्या मंचावरून महाराष्ट्रातील सागरी बंदरे, परिवहन, रस्ते आणि वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यावर भर दिला आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील गावांना तालुका आणि शहरांशी जोडणाऱ्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात नववर्षानिमित्त १३०० पेक्षा जास्त आधुनिक बस सामील करण्यात येणार आहे. राज्यातील एसटी महामंडळाच्या बसला 'लालपरी' या नावाने ओळखले जाते, जी गावागावांत लोकांना जोडण्याचे काम करते. मात्र, मागील काही वर्षांत बस कमी झाल्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत ११ लाखांपर्यंत घट झाली आहे. कोविडपूर्व काळात एसटीच्या ताफ्यात जवळपास १८,५०० बस होत्या. त्यापैकी १५,५०० बस सेवा देत होत्या आणि दररोज ६५ लाख प्रवासी एसटी बसचा वापर करत होते. कोविडनंतर ताफ्यातील १,००० बस बंद पडल्या. त्यामुळे प्रवाशांची संख्या ६५ लाखांवरून ५४ लाखांपर्यंत घटली आहे. बसेसची कमतरता असल्याने आणि प्रवाशांची मागणी जास्त आहे.

नवीन वर्षामध्ये महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला चांगल्या आणि दर्जेदार प्रवासी सेवा देण्याच्या उद्देशाने सुमारे ३५०० नव्या साध्या लालपरी बसेस एसटी च्या ताफ्यात दाखल करण्याचा मनोदय एसटीचे अध्यक्ष व मंत्री भरतशेठ गोगावले यांनी व्यक्त केला. नागपूर येथे काल घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी ही घोषणा केली. सध्या एसटीकडे बसेसची प्रचंड कमतरता आहे. एसटीच्या ताफ्यामध्ये आता १४ हजार बसेस असून करोना महामारीपूर्वी म्हणजे सन २०१८ मध्ये एसटी कडे तब्बल १८ हजार बसेस होत्या. परंतु गेल्या ३-४ वर्षात करोना महामारी व इतर काही कारणामुळे एसटीला नव्या बसेस खरेदी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे ताफ्यात असलेल्या अनेक बसेस जुन्या झाल्यामुळे त्या नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच बसेसची कमतरता असल्यामुळे प्रवाशांना अतिरिक्त बस फेऱ्या देणे शक्य होईना. या सगळ्याचा विचार करून एसटीने स्वमालकीच्या २२०० बसेस खरेदी करण्याचा व १३०० बसेस भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे. या सुमारे साडेतीन हजार बसेस जानेवारी महिन्यापासून एसटीच्या ताफ्यात समाविष्ट व्हायला सुरू होईल. त्यामुळे नवीन वर्षामध्ये प्रवाशांना रस्त्यात बस नादुरुस्त होणे, बसेसची दोन, दोन तास वाट पाहत बसणे अशा तक्रारीला कमी होतील. असे प्रतिपादन गोगावले यांनी यावेळी केले.

# अनुभवाचा खजिना : जीवनाची खरी संपत्ती

दै. आवाज वृत्तसेवा...




**✲ अनुभव फुकट मिळत नाही**

अनुभव फुकट मिळत नाही, त्यासाठी कधी वेळ, कधी पैसा, तर कधी आयुष्य खर्ची घालावं लागतं हा सुविचार आयुष्याच्या सत्य परिस्थितीवर आधारित आहे. जीवनात प्रत्येकाला कोणत्याही न कोणत्या टप्प्यावर अनुभवाची किंमत चुकवावीच लागते. अनुभव म्हणजे तुमचं भूतकाळात घेतलेलं शहाणपण, ज्या आधारावर तुमचं भविष्य ठरू शकतं.

**✲ अनुभवासाठी वेळ खर्च**

जीवनातील मोठमोठी ध्येयं गाठताना अनेकदा आपल्याला वेळ खर्च करावा लागतो. शाळा-कॉलेजमध्ये शिक्षण घेताना किंवा एखादं कौशल्य शिकताना आपण कित्येक वर्षं घालवतो. त्या प्रवास-ातून मिळणारा अनुभव आपल्या आयुष्याला एक वेगळं वळण देतो. वेळखर्ची घातल्याशिवाय जीवनाचा खरा अर्थ कळू शकत नाही.

उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी आपलं १०-१५ वर्षं वेळ देतो. त्यानंतरच त्याला योग्य अनुभव आणि शिक्षणाचं फळ मिळतं.



**लेख : संजय पाटील,**
**ब्लॉगर व सोशियल मिडीया ईन्फ्लुएंसर**

**✲ अनुभवासाठी पैसा खर्च**

कधी कधी अनुभव हा पैशाच्या स्वरूपात मिळतो. व्यावसायिक जगतात काम करताना, नवीन उद्योग सुरू करताना आपल्याला आर्थिक तोटा सहन करावा लागतो. मात्र, हाच तोटा आपल्याला पुढील काळात अनुभवाच्या रूपाने फायद्याचं वळण देतो. चुकीतून शिकत, आर्थिक गुंतवणुकीतून अनुभव मिळवणं हेच यशाकडे नेणारं पाऊल ठरतं.

व्यवसायातील थोडीशी चूक किंवा अपयश हा खूप मोठा धडा देऊन जातो, जो भविष्यात मोठी संधी मिळवून देतो.

**✲ अनुभवासाठी आयुष्य खर्च**

काही अनुभव असे असतात की त्यासाठी आयुष्याचा एक मोठा भाग खर्ची पडतो. अनेकदा माणूस आयुष्याच्या संघर्षात मोठ्या धडपडीला सामोरं जातो. पण ही धडपडच त्याला अनुभवाचं सोनं बनवून देते. आयुष्यात आलेले चांगले-वाईट क्षण, आव्हानं, ताणतणाव हे सगळे अनुभवाचं रूप घेतात.

जसं म्हणतात, जीवनात जिंकण्यापेक्षा अनुभव मिळवणं जास्त महत्त्वाचं असतं. अनुभव हेच तुमचं आयुष्य समृद्ध करतात आणि तुम्हाला यशाच्या मार्गावर उभं करतात.

**✲ अनुभवाची किंमत**

अनुभव फुकट मिळत नाही हे स्पष्ट आहे. कधी हा अनुभव आपल्याला शिकवतो, तर कधी तो आयुष्यभराचं शहाणपण देतो. त्यामुळे प्रत्येक संकट, संघर्ष आणि चुका याकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला शिकावं. कारण शेवटी, हाच अनुभव आपल्याला आयुष्यात मोठी माणसं बनवतो.

**✲ थोडक्यात...**

अनुभवाची किंमत ही वेळ, पैसा किंवा आयुष्य खर्च करूनच मोजली जाते. अनुभवातून मिळालेलं ज्ञान कधीच व्यर्थ जात नाही, उलट ते आपलं भविष्य उज्ज्वल करण्यासाठी सतत मदत करत असतं. म्हणून जीवनात मिळणाऱ्या प्रत्येक अनुभवाचा स्वीकार करावा, शिकत रहावं आणि पुढे वाटचाल करावी.

# आधुनिक कोलॅन्जिओस्कोपी प्रक्रिया

**दै. आवाज वृत्तसेवा...**
**भाऊसाहेब हुजबंद**
**(मो. ८९९९९२१९९४)**

गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी क्षेत्रात प्रगत कोलॅन्जिओस्कोपी प्रक्रिया ही अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशी क्रांतिकारी पद्धत आहे. पित्तनलिका व पॅनक्रियाच्या गुंतागुंतीच्या विकारांचे निदान व उपचार करण्यासाठी ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात फायदेशीर ठरत आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आम्ही या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रुग्णांना दर्जेदार उपचार देत आहोत.

कोलॅन्जिओस्कोपी म्हणजे काय ?

कोलॅन्जिओस्कोपी ही एक अल्प-आक्रामक (Minimally Invasive) प्रक्रिया आहे, ज्याद्वारे पित्तनलिका व पॅनक्रियाच्या नलिकेचा थेट व्हिज्युअल (प्रतिमा) अभ्यास करता येतो. पूर्वी अशा विकारांचे निदान मुख्यतः अप्रत्यक्ष इमेजिंगवर अवलंबून होते. परंतु प्रगत कोलॅन्जिओस्कोपीमुळे आता: थेट निरीक्षण पित्तनलिकेच्या आतील भागाचे होते. अचूक निदान गाठी, अरुंद जागा, आणि खडे शोधण्यात मदत होते.

उपचारात्मक कार्यक्षमता जसे की खडे फोडणे आणि बायोप्सी घेणे सोपे होते. कोलांजिओस्कोपी ही एक विशेष, सूक्ष्म, लवचिक आणि प्रकाशयुक्त ट्यूब आहे, जी पित्तनलिका (ज्या नलिका यकृतातून लहान आतड्यात पित्त वाहून नेतात) आणि कधीकधी मुख्य पॅन्क्रियाटिक नलिका (ज्यातून पचन एन्झ-इम्स आणि इतर रस पॅन्क्रियासमधून जातात) पाहण्यासाठी वा-परली जाते. हे उपकरण एंडोस्कोपिक रेट्रोग्रेड कोलांजिओपॅन्क्रियाटोग्राफी (ERCP) दरम्यान वापरले जाते, जे पित्तनलिका व पॅन्क्रियासच्या विकारांचे परीक्षण व उपचार करण्यासाठी मुख्य एंडोस्कोपिक प्रक्रियांपैकी एक आहे.



**डॉ. तुषार संकलेचा ,**
**पोट व यकृत विकार तज्ञ**
**अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नाशिक**

प्रगत कोलॅन्जिओस्कोपीची वैशिष्ट्ये व फायदे

१. अधिक अचूक निदान: या प्रक्रियेमुळे थेट निरीक्षणाद्वारे आवश्यक भागातून बायोप्सी घेतली जाऊ शकते, ज्यामुळे गाठी किंवा इतर विकारांचे अचूक निदान शक्य होते.

२. पित्तनलिकेतील मोठ्या खड्यांवर परिणामकारक उपचार: लेसर लिथोट्रिप्सी तंत्राने पित्तनलिकेतील मोठे किंवा गुंतागुंतीचे खडे फोडून शस्त्रक्रियेची गरज टाळता येते.

३. अल्प-आक्रामक प्रक्रिया: मोठ्या शस्त्रक्रियेची गरज नसल्याने रुग्णाचा त्रास कमी होतो, लवकर बरे होतात आणि दुष्परिणाम कमी होतात.

पित्तनलिकेतील अरुंद भाग आणि गाठींचे निदान ,पित्तनलिकेतील जटिल खडे काढणे,अनपेक्षित पित्तनलिका वाढीचे परीक्षण, पुनरावृत्त पित्तनलिका दाह (Cholangitis) व पॅन्क्रियाच्या समस्यांवरील उपचार यशस्वी उपचार अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये ५५ वर्षीय रुग्णाला वारंवार पित्तनलिकेतील खडे व तीव्र वेदना होत होत्या. प्रगत कोलॅन्जिओस्कोपीद्वारे लेसर लिथोट्रिप्सी पद्धत वापरून खडे यशस्वीपणे काढण्यात आले. या प्रक्रियेमुळे मोठ्या शस्त्रक्रियेची गरज पडली नाही आणि रुग्ण काही दिवसांतच सामान्य आयुष्यात परतला.

# जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष व पत्रकार गुरुनाथ तिरपणकर यांना प्रेरणा फाऊंडेशनचा राज्यस्तरिय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**वदलापूर/प्रतिनिधी :-** -समाजासाठी मणभर नाही तर कणभर द्यावे, या उक्ती प्रमाणे सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार गुरुनाथ तिरपणकर सेवाभावी कार्यात कार्यरत आहेत. पत्रकार संघटना, वृत्तपत्र लेखक संघ यावरही ते कार्यरत आ-हेत. त्यांच्या या कार्याची दखल प्रे-रणा फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा सौ.प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी घे-तली. आणि नुकताच त्यांना बदला-पूर येथील बल्लाळेश्वर मंगल कार्यालयात आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यातराज्यस्तरिय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारप्रमुख पाहुण्यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. गुरुनाथ तिरपणकर हे जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून




सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पुरस्कार वितरण सोहळा, वैद्यकीय अशा क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत.

गुरुनाथ तिरपणकर हे सिटीझन वेलफेअर असोशिएशन, कोष्टी व्हीजन ट्रस्ट, अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद, देवांग कोष्टी समाज मंडळ डोंबिवली, रत्नागिरी-सिंधुदुर्ग रहिवाशी मंडळ बदलापूर, रेल्वे प्रवासी संघटना बदलापूर, उत्कर्ष सेवा मंडळ बदलापूर,महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ, पत्रकार उत्कर्ष समिती अशा संस्थांवर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच गुरुनाथ तिरपणकर हे पाक्षिक-दीपस्तंभ, सिने न्यूज रिपोर्टर-अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, प्रतिनिधी - दै.झुंजार केसरी, सा.इंडिया सम्राट, सदस्य-मुंबई मराठी पत्रकार संघ, उपसंपादक-सा.आवाज कोकणचा, प्रतिनिधी-दै.महाराष्ट्र जीत यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.

महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आ-हेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रेरणा फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी व सचिव वैभव कुलकर्णी यांचे मनस्वी आभार व्यक्त केले आहेत. गुरुनाथ तिरपणकर यांना हा राज्यस्तरिय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# औद्योगिक कामांसाठी पीपीआर पाईप वापराविषयी उद्या व्याख्यान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक/प्रतिनिधी :-** महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनतर्फे औद्योगिक कामांसाठी पीपीआर पाईपच्या वापराचे फायदे या विषयावर उद्या शुक्रवारी ( दि. २०) व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता हॉटेल सूर्या येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे उपस्थित राहणार आहेत.

इश्रे संघटनेचे अध्यक्ष अश्पाक कागदी, अग्निसुरक्षा संघटनेचे अध्यक्ष हर्षद भामरे, महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनचे अध्यक्ष रवी पाटील विशेष निमंत्रित आहेत. केपिटी पाईप्स अल्फा पाईपिंग सिस्टीम चे मंगेश पिंपळे कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत. पीपीआर पाईप्स भारतीय बनावटीचे असून ते पारंपरिक लोखंडी,तांबे, स्टेनलेस स्टील अश्या धातूंपासून तयार झालेल्या पाईप्सपेक्षा पाचपट जास्त टिकाऊ आहेत. किफायतशीर असल्याने खर्चात बचत होते. मुख्य म्हणजे या वापरामुळे मेक इन इंडियाला प्रोत्साहन मिळेल. हे सर्वांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असल्याने सर्व सदस्यांनी व निमंत्रितांनी कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.


# भद्रकालीत अवैध गोवंश...

(पान १ वरून) बोलले जात होते मात्र पुन्हा येरे माझ्या मागल्या प्रमाणे शहरा-तील भद्रकाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत आता लव जिहाद लँड जिहाद नंतर पशु जिहाद मोठ्या प्रमाणावर केला जात असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे या अवैध धंद्यांना किंबहुना पशु जिहादला प्रोत्साहित करणारा हासे नामक पोलीस हा कारणीभूत असल्याचे देखील बोलले जात आहे या संदर्भात प्रखर हिंदू धर्म रक्षक महाराष्ट्राचे नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री नितेश राणे आवाज उठवणार का आणि भद्रकालीत सुरू असलेल्या या जिहादला मोडकळीस काढत रामराज्य आणणार का असा प्रश्न हिंदू संघटनांकडून विचारला जात आहे.

# येवला तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी रविंद्र करमासे उपाध्यक्षपदी दत्ता महाले यांची बिनविरोध निवड

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण घुगे, राजापूर/प्रतिनिधी :-** येवला कृषी उत्पन्न बाजार समिती हॉल येथे प्रथम कै संजय लोणारे पत्रकार यांना श्रद्धांजली अर्पण करूनयेवला तालुका पत्रकार संघाची मीटिंग जेष्ठ पत्रकार राकेश नाना गिरासे व लक्ष्मणराव घुगे संतोष विंचू लालाभाऊ कुडके सुनील गायकवाड सुदर्शन खिल्लारे यांच्या उप-स्थितीत संपन्न झाले व यांच्या सूचने नुसार संघाच्या अध्यक्षपदी रवींद्र करमासे तर उपाध्यक्षपदी दत्ता महाले सर , सरचिटणीस पदी मनोज भाई पटेल यांची बिनविरोध निवड करण्यात आली याप्रसंगी राकेश नाना गिरासे यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला तसेच उपाध्यक्ष यांचा सत्कार लक्ष्मण घुगे यांनी केला सरचिटणीस पदी निवड झालेले मनोज भाई पटेल यांचा सत्कार संतोष विंचू सर यांनी केला तर सुदर्शन खिलारे यांची झी२४तास प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याने त्यांचा



देखील सत्कार याप्रसंगी करण्यात आला ६ जानेवारी २०२५ पत्रकार दिनाचा कार्यक्रमा संदर्भातही चर्चा करण्यात आली कार्यक्रमास येवला तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# दहिवाळ येथे केंद्रस्तरिय जि.प.अध्यक्ष चषक स्पर्धा उत्साहात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नामदेव पवार, दहिवाळ (मालेगाव)/प्रतिनिधी-:** केन्द्रस्तरीय स्पर्धसाठी दहिवाळ केन्द्रातील १२ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलां -मुलीनी सहभाग नोंदविला. स्पर्धेला सुरूवात करताना सर्वप्रथम विद्येची देवता सरस्वती मातेच्या प्रतिमैचे पुजन करून पूषहार अर्पण करण्यात आला. यावेळी दहिवाळ ग्रामपंचायतींचे उपसरपंच सुरेश बागुल कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शांताराम पवार समवेत नारायण साळुंखे दीपक जाधव भावडू अहिरे उपस्थित होते.तसेचकेंद्रप्रमुख सुरेश पाटील सर, मुख्याध्यापक दुकळे सर ,आनंदा पवार सर, कुंदन देवरे सर ,देवरे मॅडम, शेख मॅडम ,सोनवणे मॅडम, चौधरी मॅडम ,देवरे सर प्रदीप जाधव, सर छोटू शेवाळे सर ,चंद्रकांत शेवाळे सर भेंडे सर, ,मंडलिक मॅडम, कोठावदे मॅडम ,दाभाडे मॅडम , कापडणीस सर, सूर्यवंशी सर, शेळके सर ,अशोक पवार सर, उशील सर, तायडे सर, जगताप सर अहिरे सर इत्यादी शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन आनंदा पवार सरांनी केले. या केन्द्रस्तरीय स्पर्धेतून प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थींचे बिट



स्तरावर निवड झाली आहे. बघुया केन्द्र स्तरीय जि.प.अध्यक्ष चषक स्पर्धेच्या विविध विभात प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी

**वकृत्व स्पर्धेत** प्रथम क्रमांकावर रोशन शंकर दळवी गिगाव
**चित्रकला स्पर्धेत** मानसी अर्जुन जनावरे, सिताणे, **तीनशे मीटर धावणे** मुली मोहिनी भगव, मंडलिक सिताणे, **चारशे मीटर धावणे मुले** अनिकेत दादाजी धिवरे गिगाव
**स्पेलिंग बी स्पर्धेत** स्वाधिन मोठा भाऊ शेलार सिताणे, स्पेलिंग बी स्पर्धेत मानशी शाम पाटिल गिगाव

**खो खो स्पर्धेत** मुले गिगाव संघ
**खो खो स्पर्धेत** मुली सिताणे संघ
**कबड्डी स्पर्धेत** मुले गिगाव संघ
**कबड्डी स्पर्धेत** मुली सिताणे संघ
**वैयक्तिक नृत्य स्पर्धेत** राधिका समाधान जाधव गिगाव, **वैयक्तिक गीत गायन** स्पर्धेत मानशी शाम पाटिल गिगाव
**समुह नृत्य स्पर्धेत** जि.प.शाळा गिरगाव
**समुह गीत गायन** स्पर्धेत जि.प.शाळा गिगाव, **वकृत्व स्पर्धेत** महेश जिभाऊ जगताप दहिवाळ, चित्रकला स्पर्धेत दत्ता जिभाऊ जाधव गिगाव
**शंभर मीटर धावणे** मुली स्पर्धेत अनिशा नवल जाधव खलाणे, **दोनशे मीटर धावणे** मुले सुरेश दत्तू गायकवाड अजन्देपाडा **स्पेलिंग बी** मध्ये संस्कृती सागर भवर खलाणे, **स्पेलिंग बी स्पर्धेत** ललित सागर भवर खलाणे, **वैयक्तिक नृत्य स्पर्धेत** अश्विनी आप्पा सोनवणे अजन्देपाडा **वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत** पंकज दादाजी पवार गिगाव, **समुह नृत्य स्पर्धेत** जि.प.शाळा दहिवाळ, **समुह गीत गायन स्पर्धेत** जि.प.शाळा गिगाव

# 'किक बॉक्सिंग'मध्ये लासलगावच्या सरस्वती विद्यामंदिरचे सुयश

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी** - सरस्वती विद्यामंदिर लासलगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर संपन्न झालेल्या किक बॉक्सिंग मध्ये प्रथम आणि द्वितीय प् क्रमांक पटकावला. नाशिक येथे मीनाताई ठाकरे स्टेडियम मध्ये पार पडलेल्या किक बॉक्सिंग या खेळ प्रकारात मुलांच्या गटात इयत्ता सा-तवीतील कुबेर सुनील ठोके या विद्यार्थ्याने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत गोल्ड मेडल प्राप्त केले .तर मुलींच्या गटात इयत्ता सहावीतील ओंकारेश्वरी ज्ञानेश्वर गाढे या विद्यार्थिनीने जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक संपादन करत सिल्वर मेडल प्राप्त केले. तसेच मुलांच्या गटात इयत्ता चौथीतील आयुष प्रशांत



नेटारे या विद्यार्थ्याने सिल्वर मेडल मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, इयत्ता सातवीतील साईराज सुनील लुटे या विद्यार्थ्याने ब्रांझ मेडल मिळवत तृतीय क्रमांक पटकाविला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जगदीश होळकर, उपाध्यक्ष सुलेमान मुलांनी, सचिव गुणवंत होळकर, संचालक बाळा-साहेब बोरसे ,डॉ. विकास चांदर, शाळेचे मुख्याध्यापक भीमराव शिंदे, राजेंद्र महाले विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुकाचा वर्षाव केला.

शिक्षक सुनील आव्हाड, कैलास पातळे, संदीप सूर्यवंशी नवनाथ जिरे ,कांचन शेलार, धर्मेंद्र निकम, रूपाली शिंदे, मोहन नाईक, सोनाली होळकर ,प्रदीप ठाकरे, स्वप्नील अहिरे,सुनील होळकर,दिपाली शेळके, सोनाली बागुल , वर्षा चांदगुडे, तुषार फेगडे या प्रसंगी उपस्थित होते.

# 'भारतीय राजकीय व्यवस्था, निवडणूक प्रक्रिया आणि मतदार वर्तन' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक/प्रतिनिधी-:** डॉ. भा.ल. भोले विचार मंच, नागपूर आणि यशवंत महाविद्यालय सेलू (राज्यशास्त्र व इतिहास विभाग), जिल्हा वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राजकीय व्यवस्था, निवडणूक प्रक्रिया आणि मतदार वर्तन या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र सेलू (वर्धा) येथे नुकतेच यशस्वीपणे संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. शेषकुमार येरलकर, सचिव डॉ. अशोक काळे, डॉ. प्रवीण बागडीकर (राज्यशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष), प्रा.डॉ. सचीचीत्रा मिश्रा , कार्यक्रमाचे बीजभाषण व प्रमुख वक्ते प्रा. डॉ. भागवत शंकर महाले, (राज्यशास्त्र विभागप्रमुख, (म. वि. प्र. समाज संस्था नाशिक, त्र्यंबकेश्वर महाविद्यालय) प्रा.सुरेश भोये, कथन शहा, आदीसह ९० हून अधिक प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे बीज भाषणात प्रा. डॉ. भागवत शंकर महाले म्हणाले की, भारतीय लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया हा आत्मा आहे आणि ती टिकवण्यासाठी राजकीय पक्षांचे ध्येयधोरण व मतदारांचे वर्तन महत्त्वाचे आहे. त्यांनी मतदारांच्या वर्तनावर सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्याची आवश्यकता अधोरेखित केली. मतदारांनी फक्त आर्थिक आमिषे न पाहता चांगले उमेदवार निवडणे हे लोकशाहीसाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. महाले पुढे म्हणाले की, राजकीय पक्षांनी देशाच्या हितासाठी ध्येयधोरण ठरवून समाजाच्या विकासासाठी काम करणे गरजेचे आहे. निवडणूक आयोगाचा कार्यभार तसेच



निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विश्वास कायम ठेवणे महत्त्वाचे आहे. लोकशाहीची ताकद व मतदार वर्तन हे असून मतदारांनी राजकीय प्रक्रियेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे आणि लोभापोटी चुकीच्या निवडी टाळल्या पाहिजेत. देशातील राजकीय प्रक्रियेत दिसून येणाऱ्या घराणीशाही, भांडवलशाही आणि गुंडशाही यांसारख्या आव्हानांचा मतदारांच्या योग्य निवडीनेच या अडचणींवर मात करता येईल. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला अभूतपूर्व यश मिळाले आहे. काही मतदारांनी ईव्हीएम मशीनच्या वापरावर आक्षेप घे-तले असल्याचेही त्यांनी नमूद केले. निवडणुकीत पारदर्शकतेची आवश्यकता अधोरेखित करत, त्यांनी मतदार जागृतीवर भर दिला. कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. प्रवीण बागडीकर, अध्यक्ष राज्यशास्त्र अभ्यास मंडळ, यावेळी बोलतांना म्हणाले, की चर्चासत्रामध्ये भारतीय लोकशाहीतील राजकीय व्यवस्था, निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा, मतदारांच्या मानसिकतेतील बदल, तसेच मतदारांच्या भूमिकेतून होणाऱ्या देशाच्या विकासाची दिशा यावर मार्गदर्शन केले, त्यांनी घराणेशाही, साम्राज्यशाही, आर्थिक सत्ता यावर सविस्तर राजकीय वलय असल्याचे सांगितले. मतदार वर्तन संबधी जनतेचे शासनाच्या योजनाबाबत देखील कारणीभूत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शेषकुमार येरलकर, अध्यक्षीय भाषण करतांना म्हणा-ले, भारतीय लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी निवडणूक प्रक्रिया आणि मतदार वर्तन या दोन्ही घटकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांनी लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकता व निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवर भर दिला. यशवंत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य संदीप काळे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि त्यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी महाविद्यालयाचा शैक्षणिक आढावा घेत संस्थेची प्रगती विशद केली. या चर्चासत्राने विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, अभ्यासक, आणि प्राध्यापकांना एकत्र आणत भारतीय लोकशाही व्यवस्थेच्या संवर्धनासाठी नवीन दिशा दिली. सदर चर्चासत्रात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाचे शोध निबंधाना पारितोषिक देवून गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.स्वाती देशमुख यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. राठोड सर यांनी केले.

# संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृतमोहत्सव वैकुंठ गमन सोहळा

## अखड हरीनाम सप्ताह व संगीत गाथा पारायणाचे बोटा येथे आयोजन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**किरण घायदार, नाशिक/ प्रतिनिधी-:** जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठ गमनास ३७५ वर्ष होत असून या निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व संगीत गाथा पारायण सोहळा बोटा ता. संगमनेर जि अहिल्यानगर येथे २३ ते ३० डिसेंबर या काळात आयोजीत केला आहे.

या सोहळ्यात महाराष्ट्रातील वारकरी संप्रदयातील दिग्गज महात्मे व संतांचे वंशज यांचे कीर्तन आयोजित केले आहे. या कार्यक्रमात अनुक्रमे कीर्तनकार व प्रवचनकार पुढील प्रमाणे दि. २३ संत एकनाथ महाराज यांचे वंशज योगीराज महाराज गोसावी व अगस्ती देवस्थान चे विश्वस्त राजेंद्र महाराज नवले, दि. २४ संतवीर बंडातात्या महाराज कराडकर व शिवनेरी भूषण राजाराम महाराज जाधव, दि. २५ गाथा मंदिर देहू चे अध्यक्ष पांडुरंग महाराज घुले व अगस्ती आश्रम आळंदि चे अध्यक्ष रामनाथ महाराज जाधव, दि. २६ युवा कीर्तनकार उमेश महाराज दशरथे व वेदांतचार्य दिगंबर महाराज नरवडे, दि. २७ संत नामदेव महाराज यांचे वंशज ज्ञा-नेश्वर महाराज नामदास व सुरेशर-ाज दादा राहेरकर दि. २८ ज्ञानेश्वर महाराज कदम तथा छोटे माऊली व अगस्ती आश्रम आळंदी चे उपाध्यक्ष सुदाम महाराज कोकणे, दि. २९ संत तुकाराम महाराज यांचे वंशज कान्होबा महाराज देहूकर व द्वाराचार्य रामकृष्णदास लहवितकर यांचे तुका अकाशा एवढा या विषयावर प्रवचन होईल. ३० डिसेंबर रोजी चंद्रशेखर महाराज देगलुरकर यांचे काल्याचे कीर्तन सकाळी १० वाजता होईल. यानंतर पुरण पोळी चा महाप्रसाद समस्त ग्रामस्थ बोटा तळपेवाडी माळवाडी आळे-खिंड केळवाडी कुरकुटवाडी यांच्या वतीने होणार आहे.

संत तुकाराम महाराज पादुका भव्य मिरवणूक सो-हळा २९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता होणार असून या पादुका व परिसरातील पंचक्रोशी तील मंदिरांवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी दु. ३वाजता सरपंच श्री जालिंदर गागरे यांचे वतीने करण्यात येणार आहे. संगीत गाथा पारायण सोहळा दररोज दुपारी ४वा , प्रवचन दुपारी ५ वा तर कीर्तन सायं ६.३०वा अनेक भाविकांचं उपस्थितीमध्ये होणार आहे. कीर्तनासाठी ३७५ टाळकरी असणार आहेत. व ३७५ तरुण देहू ते बोटा अशी दिव्य ज्योती आणणार आ-हेत. यावेळी आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, कृषी प्रदर्शन होणार आहे. रोज आमटी भाकरी चा महाप्रसाद परिसरातील १०० गावांच्या वतीने होणार आहे.

या कार्यक्रमास महाराष्ट्रातील कीर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक, गडकरी, टाळकरी, फडकरी, राजकीय सामाजिक क्रीडा साहित्यिक सर्व क्षेत्रा-तील व सर्व पंथीय मान्यवरांची उपस्थितीत राहणार आहेत.






# आपल्या कुटूंबासाठी तिने नाकारली वैद्यकीय सुविधा, 'हिरकणी'ची ऊसाच्या शेतात प्रसूती

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी**-: महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार व अन्य तसेच शहरातील सर्व प्रकारच्या घटकांना तसेच खेडेगावातील वाडी वस्ती पर्यंत च्या सर्व नागरीकांना आरोग्य सेवा पुरवली जाते. विशेष म्हणजे गरोदर मातांना पहिल्या महिन्यापासून लसीकरण केले जाते. प्रसुती व प्रसुतीपश्चात बाळ व मातेची विशेष काळजी घेतली जाते. बाळंतपणात माता मृत्यू बालमृत्यू होऊ नये यासाठी शासनाने अनेक उपाय योजना आखलेल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून बाहेर गावातील रोजगाराच्या निमित्ताने स्थलांतरित झालेले कामगारांच्या महिलांची काळजी घेण्याची जबाबदारी स्थानिक पातळी-वर असल्याने असेच एक ऊसतोड कामगार संजीवनी सहकारी साखर कारखाना कोपरगाव या कारखान्याचे नांदगाव तालुक्यातील जळगाव बुद्रूक येथील श्रावण शत्रुघ्न सोनवणे यांची पत्नी मनिषा श्रावण सोनवणे ह्याची सारोळेथडी ता. निफाड येथे एक्सप्रेस कालवा पुलाच्या बाजूला ऊसतोड कामगारांच्या अड्ड्यावरच चौथ्या वेळेस नैसर्गिक प्रसुती झाली. नैताळे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या आरोग्य सेवकांनी रुग्णवाहिका आणूनही नकार देत प्रसुती जागेवरच झाली. प्रसुती पश्चात बाळाची तब्बेत चांगली असुन मातेच्या शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण ५ ग्रॅम असल्याने त्यांना डमिट करून रक्त भरणे आवश्यक असल्याने नाशिक सिव्हिल हॉस्पिटलमध्ये संदर्भित करावयाचे असल्याने आशा सेविका पुष्पा आव्हाड यांनी नैताळे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे आरोग्य निरिक्षक अधिकारी भाऊसाहेब शिंदे यांना माहिती दिल्यानंतर डॉ. भाऊसाहेब शिंदे यांनी रुग्णवाहिका आणली. मात्र तीन लहान लहान मुलीच्या काळजी ने तसेच नवरा उपाशीपोटी राहिल या भीतीने स्वतः च्या उपचारासाठी नकार देत मनिषा श्रावण सोनवणे ह्या ठाम राहिल्या त्यांना उपचारासाठी दवाखान्यात जाण्यासाठी मनोबल तयार करण्यासाठी सकाळपासून दुपारी एक वाजेपर्यंत सारोळेथडीचे सरपंच बाळासाहेब आव्हाड ग्रामसेविका कुंदा केदारे /पगारे, आरोग्य निरिक्षक अधिकारी डॉ. भाऊसाहेब शिंदे डॉ. पुरूषोत्तम चारोटे ,आरोग्य सेवक कल्पेश महाजन, श्रीमती के. आर. मोरे आरोग्य सेविका मॅडम, रूग्ण वाहिका १०२ चालक भाऊराव भवर, पत्रकार मुकुंद आव्हाड, आशा सेविका पुष्पा आव्हाड, कावेरी सुर्यवंशी सागर नागरे, उमेश सानप धनाजी नागरे यांची विनंती धुडकावत हतबल आरोग्य प्रशासन व ग्रामपंचायत प्रशासनाला परतावा लागले. अखेर लहान लेकरांच्या काळजी पोटी स्वतः च्या आरोग्यासाठी उपचार न घेणारी मातेला हिरकणी जिंकली असेच म्हणावे लागेल.




# राजकमल एंटरटेनमेंट'ची दमदार घोषणा, महाराष्ट्र भूषण अशोक सराफ आणि वंदना गुप्ते अभिनित नवा मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला!

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मुंबई/प्रतिनिधी** -: 'राजकमल एंटरटेनमेंट' या पूर्णतः नवीन प्रॉडक्शन हाऊसच्यामार्फत प्रेक्षकांना एक नवा चित्रपट लवकरच मोठ्या पडद्यवार अनुभवायला मिळणार आहे. विशेष म्हणजे 'राजकमल एंटरटेनमेंट' ही नवीन कंपनी सुरू करणारे मालक म्हणजेच राहुल शांताराम, हे चित्रपती व्ही. शांताराम, ज्यांनी मराठी सोबतच संपूर्ण भारतीय सिनेसृष्टीत मोलाचे योगदान दिले, त्यांचे नातू आणि किरण व्ही. शांताराम यांचे चिरंजीव आहेत. आपल्या आजोबांकडून प्रेरणा घेत, राहुल शांताराम यांनी हितकारक मनोरंजन देणारे चित्रपट तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. चित्रपटाचे शीर्षक अजून गुलदस्त्यातच असले, तरी या चित्रपटात अनेक वर्षांनी आपल्याला दिग्गज अभिनेते महाराष्ट्र भूषण अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांची जोडी रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. त्यामुळे प्रेक्षक वर्गाला नक्कीच हा चित्रपट एक मेजवानी ठरणार आहे. थोडी खट्याळ, थोडी गोंडस आणि थोडी हळवी अशी ही अनोखी गोष्ट आपल्या समोर सादर करायला राहुल शांताराम हे सज्ज आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन लोकेश गुप्ते हे करत आहेत.




'राजकमल एंटरटेनमेंट'चा हा नवा चित्रपट नवीन वर्षी म्हणजेच १० एप्रिल २०२५ रोजी आपल्या भेटीला येणार आहे, त्यामुळे प्रेक्षकांसाठी एक अभूतपूर्व पर्वणी ठरणार हे नक्की.

# नायलॉन मांजा वापरणार तर हजार रुपये दंड

## लासलगाव ग्रामपंचायत प्रशासनाचा दंडात्मक कारवाईचा इशारा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी**-: नवीन वर्षातील पहिला आनंदाचा सण म्हणजे मकार संक्रांत. हा सण दिवसभर पतंग उडवुन तर रात्री तिळगुळ वाटुन साजरा करत असतात. पतंग उडवितांना अनेक जणांकडुन नायलॉन मांजा वापरला जातो. त्यामुळे अनेक नागरीकांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. तसेच उंच झाडांवर मांज्यामध्ये पक्षी अडकल्याने मृत्युमृखी पडले तर काही जखमी झाल्याचे यापुर्वी अनेक घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे आपण आनंदोत्सव साजरा करत असतांना इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. पतंग उडविण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर करण्यात येवु नये. यासाठी ग्रामपंचायत प्रशासन अँक्शन मोडवर आलेले आहे. जर ग्रामपंचायत हद्दीमध्ये कुणा नायलॉन मांजा विक्री करतांना आढळुन आल्यास आणि वापर करतांना आढळुन आल्यास रु.१०००/- पर्यंतची दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

यावर्षी कोणत्याही ागरीकांला किंवा पशु-पक्षांना नायलॉन मांज्यामुळे जखमी किंवा मृत्युमृखी पडण्याची वेळ येवु नये यासाठी ग्रामपंचायत लासलगांवने गावामध्ये दवंडी आणि सोशल मिडीयावर मेसेज पाठवुन नायलॉन मांजावर बंदी असल्याचे कळविले आहे. जर ग्रामपंचायत हद्दीमध्ये कुणी नायलॉन मांज्याची विक्री आथवा पतंग उडविण्यासाठी वापर केल्यास रु.१०००/- पर्यंत दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.




तसेच एकदा दंड झाल्यावर पुन्हा नायलॉन मांज्याची विक्री अथवा वापर करतांना आढळुन आल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची जाहीर सुचना देण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायतीने दिलेल्या संदेशामध्ये लासलगांव हद्दीमधील सर्व नागरीकांना आणि व्यावसायिकांना कळविण्यात आलेले आहे की, ग्रामपंचायत लासलगांवने शासनाच्या माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये सहभाग घेतलेला असल्याने पर्यावरणाचे व पशु-पक्षांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. शासन निर्णायानुसार नायलॉन मांजा व तत्सम मांजा वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे गावी नवीन वर्षामध्ये येणाऱ्या सणांचे निमित्ताने साजरा करण्यात येणाऱ्या पतंग महोत्सवासाठी नायलॉन मांजाची विक्री आणि वापर कुणीही करु नये. आपल्या परिसरामध्ये कोणी व्यावसायीक नायलॉन मांजा विक्री करत असल्यास त्याची माहीती तात्काळ ग्रामपंचायत कार्यालयास कळविण्यात यावे असा संदेश नागरीकांना पाठविण्यात आलेला आहे.

नायलॉन मांजाचा वापर केल्याने अनेक नागरीकांना आमि पशु पक्षांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. त्यामुळे आपण आनंद साजरा करत असतांना इतर कुणाला ईजा होणार नाही, कुणाचा जीव जाणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आपल्या कृत्यामुळे दुसऱ्यांच्या घरात दुःख साजरा करण्याची वेळ येणार नाही यासाठी नागरीकांनी स्वतःहुन नायलॉन मांजाचा वापर टाळावा.
- श्री.एल.जे.जंगम (ग्रामपंचायत अधिकारी)




# माणूसमित्र सुरेश पवार व शेकोटी साहित्य संमेलन नाशिक

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**नाशिक/प्रतिनिधी:**- गावकुसाच्या काट्याकुट्या धसकटाच्या बांधावरून ते शहरातील सिंमेटच्या जंगलात वास्तव्य करून उद्योग व्यवसाय सांभाळून, आपल्या कसदार लेखनीतून शेती मातीतून उज्वल साहित्याचे पीक काढणारे, गिरणा गौरव प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, साहित्यिक, संपादक, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी पार पाडणारे, कला क्रिडा संस्कार संस्कृतीचे उपासक, अखिल भारतीय शेकोटी साहित्य संमेलनाचे पहिले संस्थापक अध्यक्ष, उपक्रमशिल व ध्येये वेडे कलाव्यासंगी माणूसमित्र मा. सुरेशजी पवार, यांच्या गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या कार्यालयात स्नेहभेटीचा योग आला असता, एक भेट ग्रेट भेट व शेकोटी साहित्य संमेलना विषयी शब्द प्रपंच ! सध्या संपूर्ण राज्यात गिरणा गौरव प्रतिष्ठान आयोजित, जानेवारी १० व ११, २०२५ च्या शेकोटी साहित्य संमेलन नाशिक क्षेत्रीचे वारे वाहात आहे. गेल्या तीन वर्षापासून अविरत शेकोटी पेटत ठेवण्याचे काम सुरेश पवार व त्यांची टिम करत आहे. शेकोटी विषयी जानूण घेण्याची उत्सुकता होतीच, तत्पूर्वी नित्य कुणाचेही शाब्दीक स्वागत आदरातिथ्य करतात, तसे आमचे देखील स्वागत आदरातिथ्य शब्द सुमणांनी केले. गावगाडाकार म्हणून मला नेहमी खाजगीत ओळखत असल्याने, आमच्या सर्वच विषयांवर मनमोकळ्या गप्पा झाल्या. साहित्य संमेलन व गप्पांमध्ये आम्ही उत्कंठ बुडून गेलो रंगून गेलो होतो. माझ्यासोबत ज्ञानसिंधु प्रकाशन नाशिकचे तान्हाजी खोडेसर नेहमी सारखे आवर्जून सोबत होते. निमित्त होते, आमच्या सगर साहित्य निर्मिती केलेले , सगर सेवार्थी व्यक्तिविशेष विशेषांक , सगर दीपोत्सव दिवाळी अंक, परिसस्पर्श कादंबरी इ. इ. इ. त्यांना स्नेहभेट देणे गरजेचे होते.



माणूसमित्र सुरेश पवार साधी राहाणी उच्चविचार सरणी, सेवा शिस्त नम्रता अंगी बाळगून, साहित्य शारदेच्या साहित्य वारीचे वारकरी ! कधी निसर्ग वारी, कधी विठू दारी ! कधी काव्य संमेलन कधी साहित्य संमेलन ! नेहमीच व्यस्त ! शासकीय, निमशासकीय, सामाजिक शैक्षणिक सांस्कृतीक अध्यात्मिक , नव्हे नव्हे तर संपूर्ण राज्याला परिचित असलेले सुरेश पवार म्हणंजे अथांग सागरातून निघालेल्या शिंपल्यातील माणिक मोतीच ! ते स्वःता मुरब्बी लेखक कवी संपादक असून त्यांच्या साहित्यात ज्ञान विज्ञान अध्यात्म ठासून भरलेले असते. शेकडो मान सन्मान पुरस्कारांचे ते मानकरी ठरले आहेत. त्यांच्या कार्यालयात असंख्य पुस्तके मासिके गौरव पत्र ट्रॉफ्या खच्चून भरलेल्या दिसत होत्या. त्यांच्या बोलण्यातून स्वामी विवेकानंद यांचे विचारांची शिदोरी ऐकावयास मिळाली. विज्ञान युगातही ते अध्यात्माची पाठराखण करण्यात त्यांचा हातखंडा आहे. दोन दिवसीय शेकोटीच्या माध्यमातून अखिल महाराष्ट्रातून आलेल्या कलावंताचा ते लोक जागर करतात. काळाच्या ओघात लोप पावत चाललेल्या वाडी वस्ती खेड्यापाड्यातल्या लोककला जिंवत राहाव्या म्हणून, गिरणा गौरव प्रतिष्ठान शेकोटी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून, दरवर्षी प्रयलशील असते. ह्या ही वर्षी भावबंधन मंगल कार्यालय मखमलाबाद पंचवटी येथे प्रथे प्रमाणे पहिल्या दिवशी बैलगाडीतून सवाद्य वाजत गाजत ग्रंथ व साहित्याची दिंडी विविध नृत्यकला तसेच शेकोटी पुजन प्रज्वलन ते अभंगा पासून ते लावणी पर्यंत, टींगरी पासून ते भिंगरी पर्यंत, पोवाड्या पासून तमाशा पर्यंत ! नव्हे, नव्हे, पहाटेची भूपाळी काय ! जात्यावरच्या ओव्या काय ! मराठी अहिराणी लोकगीते ते भारूडे काय ! इथे काय नाही हे विचारा ! रात्रभर जागर असतो. शेकोटीत मराठी कवीकट्टा , गझला, अहिराणी कवी कट्टा हमखास असतो. इथे शेकडो साहित्यिक हजेरी लावतात. सर्वांना चहा नाश्ता जेवणं झाल्यावर कुठे मुलाखती कुठे मनोरंजन हे ठरलेलेच असते. दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच जोडीस परिसंवाद व जाहीर केलेले विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शेवटी तिळगुळ व संक्रांतीच्या शुभेच्छा देत, महिला एकमेकींना हळदी कुंकूचे वाणं देतात, साहित्यिक पुन्हा भेटूया म्हणून, गळाभेट घेऊन, परतीच्या मार्गाला लागतात. रंजन मनोरंजन ज्ञान विज्ञान अध्यात्म विचार सुविचार पेरणारे व अंगीकारणारे माणूसमित्र मितभाषी सुरेश पवार व गिरणा गौरव प्रतिष्ठान व त्यांच्या टिमचे अभिनंदन.

**-लेखक : गावगाडाकार साहेबराव नंदन तात्या ताहाराबादकर नाशिक**